K. S. Wani Memorial Trust
NEWS LETTER
Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.12 | January - March 2021 | K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

Printing Institute News

डी. पी. ए. अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर



कोरोना महामारीमुळे विद्यापीठाचा तृतीय सत्र वर्षाच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाला असून द्वितीय वर्ष डी.पी.ए. वर्गातून श्रेयस पवार व जयेश देसले हे विद्यार्थी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. तसेच अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा विद्यापीठाने मे महिन्यात बहुपर्यायी प्रश्न स्वरुपात Online होणार आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या पदाधिकारयानी अभिनंदन केले आहे.



प्रजासत्ताकदिन साजरा

२६ जानेवारी २०२० रोजी मा. विश्वस्त श्री. जितेंद्र सोनगिरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून ७२ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुद्रण शिक्षण संस्था, रेऊ वाणी विज्ञान विहार, बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाचे सर्व कर्मचारी पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

चाळीसगाव रोटरी क्लब सदस्यांची का.स.वाणी संस्थेला सदिच्छा भेट



चाळीसगाव येथील सामाजिक व शैक्षणिक कार्यात नावलौकिक मिळवलेल्या 'रोटरी क्लब' संस्थेच्या सदस्यांनी का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.सी ए. श्री शशिकांत धामणे यांच्या उपस्थितीत का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या विविध विभागांची पाहणी केली. प्रथम त्यांनी मंजुळाबाई नारायण वरखेडे ग्रंथालय व माहिती स्त्रोत विभागाला भेट दिली. ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ, संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिकांचे बांधीव संच पाहून अचंबित झालेत.

स्पर्धा परीक्षेत बसलेले विद्यार्थी,अभ्यासक, संशोधक यांच्या अध्ययनासाठी व त्यांचा व्यक्तिमत्व विकासासाठी ग्रंथलयातील ग्रंथसंपदा निश्चितच उपयुक्त ठरेल, या शब्दात अभिप्राय नोंदविला. यावेळी त्यांनी मुद्रण तंत्र कला विभाग, कमर्शियल संगणक विभाग, रेऊ वाणी विज्ञान विहार, बालनेत्र सुरक्षा प्रकल्प, MIDC प्रिंटिंग युनिट या विविध विभागांची माहिती करून शैक्षणिक सामाजिक आणि आरोग्यविषयक कार्यात स्व. डॉ. जगन्नाथ वाणी यांनी दिलेले योगदान भावी युवा पिढीला प्रेरणादायी ठरेल या शब्दात त्यांनी संस्थेच्या विधायक कार्याविषयी प्रशंसा केली.

आदरणीय सी. ए. शशिकांतजी धामणे यांचे मनःपूर्वक अभिनंदन !



मा.सी.ए.शशिकांतजी धामणे


का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानचे विद्यमान अध्यक्ष आदरणीय आप्पासाहेब सी. ए. शशिकांतजी धामणे यांची इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट असोसिएशन ऑफ इंडिया द्वारा दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता (Insolvency & Bankruptcy code) या समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून स्तुत्य निवड झाल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन !

आपल्याकडे असलेल्या प्रदीर्घ अनुभवाचा व या क्षेत्रातील सखोल ज्ञानाचा समितिला सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी व संबंधित क्षेत्रातील प्रकाशने व प्रशिक्षणार्थीना भविष्यात नक्कीच लाभ होईल. आपल्या उत्तुंग कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. संस्थेच्या विश्वस्त मंडळ , सर्व पदाधिकारी व कर्मचारी वृंदातर्फे आपले पुनःश्च अभिनंदन व आपल्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

जागतिक मुद्रण दिनानिमित्त बदलते मुद्रण तंत्रज्ञान व रोजगाराच्या संधी या विषयावर चर्चासत्र

का. स. वाणी संस्था, धुळे व औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा मुद्रण तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन तंत्रज्ञानाचा वापर करीत मुद्रण क्षेत्राचे जनक जोहान्स गुटेनबर्ग यांची ५५० वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी बदलते मुद्रण तंत्रज्ञान व रोजगाराच्या संधी या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

संस्थेचे विश्वस्त मा. जितेंद्र सोनगिरे यांनी जोहान्स गुटेनबर्ग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ऑनलाईन कार्यक्रमाचे उदघाटन केले. या चर्चासत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुद्रण तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख मा. प्रा.पराग हसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज असायला हवे असे सांगताना २१ व्या शतकातील फादर ऑफ डिजिटल प्रिंटींग बेनी लांडा यांच्या नॅनोग्राफी तंत्रज्ञानावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे अध्यक्ष मा बाळासाहेब आंबेकर, टेक्नोव्हा कंपनीचे अधिकारी मा राकेश गोयधनी, दोन्ही महाविद्यालयांचे मुद्रण तंत्र पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी , संस्थेचे कर्मचारी तसेच मुद्रण क्षेत्रातील स्थानिक मान्यवरांनी ऑनलाईन सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रा. प्रसाद पुराणिक यांनी केले तर संस्थेचे आय. टी. कॉर्डीनेटर प्रा. निलेश पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.





संस्थेचे विश्वस्त मा. जितेंद्र सोनगिरे यांनी जोहान्स गुटेनबर्ग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ऑनलाईन कार्यक्रमाचे उदघाटन केले.



चर्चासत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुद्रण तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख मा. प्रा.पराग हसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

विटाभट्टीवरील मुलांसाठी विविध उपक्रम

मोराणे बायपास येथील विटाभट्टीवरील मुलांसाठी दिवाळीच्या निमित्ताने फराळ वाटप व कपडे वाटप करण्यासाठी जेव्हा या वस्तीला भेट दिली, त्यावेळी तेथील बालके पोषण आहाराच्या व स्वच्छतेच्या अभावामुळे त्यांना त्वचेचे आजार व बऱ्याच आरोग्यविषयक समस्या असल्याचे निदर्शनास आले. कोविड महामारी कारणाने शाळा बंद असल्यामुळे नेत्र तपासणीचे फिल्ड वर्कचे काम नव्हते. मिळालेल्या वेळेचा सद्उपयोग करत जवळजवळ असणाऱ्या तीन विटाभट्टीची निवड करून या मुलांसाठी पोषण आहार वाटप, कपडे वाटप, आरोग्य तपासणी कॅम्प, वैयक्तिक स्वच्छता व किमान प्राथमिक शिक्षण या मुलांना देण्यासाठी धडपड सुरु झाली.



विविध विटाभट्टीतील दृश्य


विटाभट्टी येथील मुलांना जेवण

लॉकडाऊनमुळे बांधकाम क्षेत्रातही मंदीचे सावट असल्यामुळे विटाभट्टी येथील लोकांना हाताला पुरेसे काम नव्हते त्यामुळे घरात असलेल्या चार पाच लेकरांच्या उदरनिर्वाहासाठी संतुलित आहार देणे त्यांच्या पालकांना शक्य होत नव्हते. त्यांची ही गरज लक्षात घेऊन मा.श्री अग्रवालजी यांच्या आर्थिक मदतीने व प्रेरणेने पोषण आहार (जेवण) वाटप हा उपक्रम राबविण्यात आला.



विटाभट्टी येथील मुले जेवणाचा आंनद घेतांना

यामध्ये मुलांसोबतच स्तनपान करणा-या व गर्भवती महिलानाही समाविष्ट करण्यात आले. पोषण आहारात रोज एक हिरवीभाजी, फळभाजी, पोळ्या, वरण भात, खिचडी, मसालेभात व सलाड (काकडी, गाजर, लिंबू टमाटा कोशिंबीर,फळे) इ. यांचा समावेश होता जेणेकरून त्यांना सर्वसमावेशक असा संतुलित आहार मिळू शकेल. सदर उपक्रम मुलांसाठी आनंदाची पर्वणीच ठरला. रोज मुले आमची वाट पाहू लागली, सुरवातीला पंचवीस ते तीस बालकांपासून ते हळूहळू ही संख्या पंच्याहत्तर ते ऐंशी पर्यंत वाढली तरीही बालनेत्रच्या सर्व टीमने स्वयंपाकापासून तर वाटपापर्यंत सर्वच काम स्वत: आनंदाने केले.



करोना काळात विटाभट्टी येथील मुलांसाठी व स्तनपान करणा-या व गर्भवती महिलांसाठी जेवण

विटाभट्टी येथील मुलांना आनंदाई शिक्षण

जेवण वाटप करत असतांनाच या मुलांशी संवाद साधला जात होता तेव्हा लक्षात आले की ही मुले वेगवेगळ्या गावातून स्थलांतरित आहेत. त्यांची शाळा गावाकडे असल्यामुळे ते शाळेत जाऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना किमान प्राथमिक शिक्षण तरी मिळावे त्यासाठी आठवड्यातून पाच दिवस रोज चार तास त्यांना शिकविण्याचे ठरवत कृतीला सुरवात झाली.



विटाभट्टी येथील स्थलांतरीत मुलांसाठी शिक्षण देताना

तेथील स्वामी समर्थ मंदिराच्या सभामंडपात मुलांना शिकविण्यास सुरवात केली पण गुजरातकडील मुलांना हिंदी समजायचे तर जवळच्या गावातून आलेल्या भिल्ल, पावरी मुलांना मराठीही समजत नव्हती. यावेळी वेगवेगळे ग्रुप करून त्यांना शिकविण्यास सुरवात केली. मुलांना कंटाळा वाटू नये यासाठी मूल्यशिक्षण, चित्र काढणे, रंगवणे व विविध खेळ या बाबीचा समावेश करण्यात आला.



मुलांसाठी शिक्षणा बरोबर खेळ व इतर उपक्रम

अक्षर ओळख, अंक ओळख, स्वच्छतेचे महत्व हे गाण्यातून, चित्रातून, खेळातून शिकविण्यात येत आहेत. शिक्षणासाठी लागणाऱ्या शैक्षणिक साहित्य मुलांना का. स. वाणी संस्थेच्या सचिव डॉ. शोभा शिंदे यांच्या आर्थिक मदतीने वाटप कण्यात आले. त्यात पाटी, पेन्सील, चित्रकलेसाठी रंग, वही, अंक अक्षर ओळखीसाठी चार्ट, इत्यादीचा समावेश होता. मुलांनी दररोज शिकण्यासाठी यावे यासाठी रोज जेवण, फळे देणे सुरु आहे.



मुलांनी दररोज शिकण्यासाठी यावे यासाठी शिक्षणाबरोबर पोषण आहार

रोटरी क्लब चाळीसगाव तर्फे कपडे वाटप व आरोग्य तपासणी कॅम्पचे आयोजन

बालनेत्र प्रकल्प करीत असलेले काम चाळीसगाव रोटरीच्या सदस्यांना संस्थेचे अध्यक्ष यांच्याकडून माहीत झाले. त्यांनी या उपक्रमासाठी रोटरी क्लब सदस्यांना आवाहन करीत जुने परंतु न फाटलेले व चांगल्या स्थितित कपडे जमा करून वाटप करण्यात आले व त्यावेळी आरोग्य शिबिर औषधी वाटप, खाऊ वाटप, इ कार्यक्रमही घेण्यात आले. चाळीसगाव येथील पुष्पराज गारमेंटसचे मालक व रोटरी सदस्य यांनी तेथील मुलांना नवीन कपडे , गणवेश वाटप केले. रोटरीचे माजी सहाय्यक प्रांतपाल तथा अस्थिरोग तज्ञ डॉ. सुनील राजपूत यांनी आरोग्य तपासणी करून गजेनुसार औषध वाटप केले. यासाठी रोटरीचे अध्यक्ष नितीन पाटील यांनी का.स. वाणी संस्थेचे अध्यक्ष व रोटरी क्लब चाळीसगावचे सदस्य श्री. शशिकांत धामणे व प्रकल्पाच्या सर्व सहकारी वर्गाचे आभार मानले.




रोटरी क्लब चाळीसगाव यांच्या तर्फे औषधी, गणवेश व कपडे वाटप

रेऊ वाणी विज्ञान विहार

रेऊ वाणी विज्ञान विहारात गणित दिनानिमित्ताने ऑनलाईन मार्गदर्शन संपन्न

श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म दिवस गणित दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून का. स. वाणी. स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे २२ डिसेंबर २०२० पासून दर महिन्याच्या २२ तारखेला गणित विषयावर ऑनलाइन मार्गदर्शन आयोजित करण्यात येते. यावेळी सांगली जिल्ह्यातील गोटखिंडी विद्यालयाचे गणित शिक्षक मा.श्री. देवेंद्र बापूसाहेब पाटील यांनी Number System in Math's या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन केले. त्यात Natural Numbers, Whole Numbers, Integers Fractions, Rational Numbers, Irrational Numbers Real and Imaginary Numbers, Prime Numbers and Composite Numbers याचा समावेश होता. स्पर्धा परीक्षेचा हा महत्वाचा भाग असल्यामुळे सदर मार्गदर्शनाचा लाभ इयत्ता पाचवी ते दहावीच्या अनेक विद्यार्थ्यांनी घेतला.तसेच या कार्यशाळेत पुणे येथील विज्ञान वाहिनीचे मा.श्री.शरद गोडसे सरही उपस्थित होते.



मा.श्री.देवेंद्र बापूसाहेब पाटील विद्यार्थ्यांना ऑन लाईन मार्गदर्शन करतांनाच्या स्लाईड

डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेचे वर्ग

विज्ञान विहारात दरवर्षी प्रमाणे या शैक्षणिक वर्षातही डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेच्या प्रयोग फेरीची तयारी करून घेण्यासाठी इयत्ता ६ वी व ९ वी चे वर्ग घेण्यात आले. सदर मार्गदर्शन वर्गात विद्यार्थ्यांनी १२०पेक्षा अधिक प्रयोग स्वत: करून बघितले. तसेच प्रयोग वर्गाच्या १० सराव परीक्षाही घेण्यात आल्या.सदर वर्गाला मा. श्री. व्ही. वाय. दाबके सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले व विद्यार्थ्यांच्या शंकेचेही निरसन केले.



वैज्ञानिक स्पर्धेचे विद्यार्थी प्रयोग समजून घेतांना व सराव परीक्षा देतांना

विज्ञान दिनानिमित्त विविध उपक्रम

रेऊ वाणी विज्ञान विहारात लॉकडाऊनच्या सर्व नियमांचे पालन करत विज्ञानदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्रा. संतोष बिरारी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी Artificial intelligence, (IOT) Internet of things, Virtual reality. यासारख्या येऊ घातलेल्या टेक्नॉलॉजीची ओळख विद्यार्थ्यांना करून देत त्याचा सुयोग्य वापर करत मानवी जीवन सुखकारक करण्यासाठी संशोधनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर असल्याचे सांगितले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. व्ही. वाय. दाबके सर यांनी स्लाईड शो मार्फत 'आपली सूर्यमाला' या विषयावर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करून बघण्याची संधी व मार्गदर्शन

विज्ञान दिनानिमित्त विज्ञान विहारात भेटीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील व गमतीजमती चे प्रयोग स्वतः करून बघिले. त्यावेळी विज्ञान विहारात त्यांना मेंदूची रचना व कार्य समजून घेत विद्यार्थ्यांनी ब्रेनकॅप बनविल्या.



संस्कार अकॅडमीचे विद्यार्थी प्रत्यक्ष प्रयोग करून बघतांना

बक्षिस वाटप

रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञानदिनाचे औचित्य साधून बक्षिसे वाटप करण्यात आली. तसेच इयत्ता ६ वी व ९वी च्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत ज्या विद्यार्थ्यांची प्रथम फेरीत निवड झाली त्या विद्यार्थ्यांनाही बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



आदरणीय व्ही. वाय. दाबके व मा.प्रा. संतोष बिरारी विद्यार्थ्यांना बक्षिस देताना

का.स.वाणी. मराठी प्रगत अध्ययन संस्था उपक्रम


मराठी राजभाषा गौरवदिन साजरा



ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ तात्यासाहेब वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी राज भाषा दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. यावर्षी आपल्या का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या मंजुळाबाई नारायण वानखेडे ग्रंथालय व माहिती स्रोत विभागात "समग्र कुसुमाग्रज साहित्यदर्शन"या शीर्षकाखाली ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित यांनी कुसुमाग्रजांनी लिहिलेल्या विविध साहित्य प्रकारातील ग्रंथांचा परिचय करून दिला.

खरया अर्थाने का.स.वाणी संस्थेच्या उभारणीत तात्यासाहेब वि.वा. शिरवाडकर यांचे आशीर्वाद लाभले आहेत. त्यांच्याच पदस्पर्शाने आणि शुभहस्ते संस्थेची पायाभरणी झाली आहे. स्व. डॉ. जगन्नाथ वाणी तात्यासाहेबांना प्रेरणास्थानी मानत. मराठी भाषा विकासाचे स्वप्न पूर्ण करणे हा त्याचा ध्यास होता. यावेळी तात्यासाहेबांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. उपस्थित कर्मचारी, विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांना विनम्र अभिवादन केले.

आदरणीय बक्षी काकांचे मनःपूर्वक अभिनंदन !



डॉ. वाणी यांचे निकटवर्तीय स्नेही स्क्रिजोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन, पुणे या संस्थेचे माजी अध्यक्ष आदरणीय अमृत बक्षी काका यांची जागतिक आरोग्य संघटनेशी संलग्नित मानसिक आरोग्य सेवा विकास केंद्र (Centre for Mental Health Service Development) क्वीन मेरी युनिव्हर्सिटी ऑफ लंडनच्या वतीने आंतरराष्ट्रीय संशोधन सल्लागार समितिवर सन्माननीय सदस्य म्हणून स्तुत्य निवड झाल्याबद्दल संस्थेच्या विश्वस्त मंडळ, सर्व पदाधिकारी व कर्मचारी वृंदातर्फे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

मनःपूर्वक अभिनंदन



का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सचिव प्रा.डॉ. शोभा शिंदे यांची धुळे जिल्हा ग्राहक संरक्षण समितीवर अशासकीय सदस्य म्हणून स्तुत्य निवड झाल्याबद्दल संस्थेच्या विश्वस्त मंडळ, सर्व पदाधिकारी व कर्मचारी वृंदातर्फे त्यांचे मनःपुर्वक अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

खानदेश साहित्यिकांचा उत्तम प्रतिसाद

'खानदेशच्या सांस्कृतिक इतिहास' पूनर्लेखन प्रकल्पासाठी 'संदर्भग्रंथ' म्हणून खान्देशातील साहित्यिकांसाठी का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या ग्रंथालयात 'लेखकाची एक प्रत' या सदराखाली ग्रंथभेट उपक्रम गेल्या वर्षी सुरू केला होता. या उपक्रमाचे आवाहन वृत्तपत्राद्वारे करण्यात आले होते. या उपक्रमाला मान्यवर साहित्यिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

यात प्रामुख्याने कवी डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा.फुला बागुल, अहिराणी साहित्यिक श्री. सुभाष अहिरे, अशोक कोतवाल, गोकुळ बागूल, अशोक कौतिक कोळी, प्राचार्य रत्ना पाटील, श्री. रामदास वाघ, संजय वाघ, सौ.माया धुप्पड, प्रा.आबा पाटकरी, श्रीमती लतिका चौधरी, प्रा.रमेश राठोड, सौ संगीता म्हसकर, प्रा.भगवान पाटील, श्री. सुनील गायकवाड, जगदीश पाटील, मंदाकिनी पाटील, प्रभाकर शेळके, प्रा.रवींद्र पांढरे, डॉ. सुधा खराटे, डॉ.लुगसे मॅडम, श्री. लक्ष्मण कुलकर्णी, विनायक पाटील, प्रा.वा.ना. आंधळे,विलास मोरे, श्री. महेश पाटील, प्रा. डॉ. सुनील नेणे अशा संस्थेवर प्रेम असलेल्या अनेक साहित्यप्रेमी लेखकांनी मोलाची भर घातली, त्याबद्दल संस्था कायम ऋणी राहील, असे संस्थेच्या संचालिका प्रा.डॉ. वंदना महाजन यांनी कळविले आहे.

भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे ३२ वे अधिवेशन

यंदाचे भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे 32 वे अधिवेशन व आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. 28, 29 व 30 जानेवारी रोजी covid-19 या पार्श्वभूमीवर ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील यांच्या शुभहस्ते अधिवेशनाचे उद्घाटन झाले. यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली व का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सी.ए. श्री. शशिकांत धामणे, स्मृती प्रतिष्ठानचे सचिव प्रा.डॉ. शोभा शिंदे आणि संस्थेचे संचालक डॉ. वंदना महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत पहिले सत्र संपन्न झाले. संस्थेचे संचालक प्रा.डॉ. वंदना महाजन यांनी प्रास्ताविक व परिषदेची भूमिका कथन केली. उद्घाटनानंतर सुप्रसिद्ध लेखिका व कवयित्री उर्वशी बुटालिया यांनी 'लिंगभान, पुरूषसत्ता आणि सांस्कृतिक बदल' या विषयावर बीजभाषण सादर केले.

उद्घाटनपर भाषणात प्रा. डॉ. के. बी. पाटील म्हणाले 'पुरुषसत्ता संस्कृती बदलविण्यासाठी पुरुषांची मानसिकता बदलली पाहिजे. देवधर्माची निर्मिती ही पुरुषांनी केली आहे. आजही पुरुषसत्ता वर्चस्व गाजविताना दिसतात. तृतीय पंथीयांना अपमानित जीवन जगावे लागते, ही मानसिकता बदलल्याशिवाय सांस्कृतिक बदल होणे अशक्य असल्याचे सांगितले.

प्रमुख उपस्थितीत मनोगत व्यक्त करताना सी.ए. श्री. शशिकांत धामणे म्हणाले, 'गेल्या 32 वर्षांपासून संस्थेतर्फे चर्चासत्र, परिषदा, परिसंवाद, कार्यशाळा या माध्यमातून प्राध्यापक संशोधक व लेखकांचे प्रबोधन होत आहे. महाराष्ट्र आणि बुहःन्महाराष्ट्रात यशस्वीरित्या परिषदांचे आयोजन केले आहे. आदिवासी दुर्गम भागात संस्थेने परिषद आणि कार्यशाळा यशस्वी करून तत्कालीन नंदुरबार जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मल्लीनाथ कलशेट्टी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली आहे. संस्थेचे नवनवीन प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर असल्याचे सांगून स्व. डॉ. जगन्नाथ जगन्नाथ वाणी यांच्या प्रेरणेने मराठी भाषा संस्कृतीच्या विकासासाठी सातत्याने आमचे प्रयत्न सुरू राहतील असे सांगून सहभागी प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्यात. अध्यक्षीय भाषणात डॉ. यशवंत मनोहर म्हणाले, 'पुरुषसत्ता लिंगभान निसर्गतः जन्मात येत नाहीत हे हितसंबंधातूनग्रस्त समाजात घडविले जाते म्हणून ही घडवण्याची प्रक्रिया सर्वांच्या मनातून निपटून काढावी लागेल असे झाल्याशिवाय सांस्कृतिक बदल संभवत नसतो. या शब्दांत त्यांनी मनोगत व्यक्त केले. तीन दिवसांच्या चर्चासत्रात ऑनलाईन कार्यक्रमात प्रा. प्रतिभा परदेशी, रमा गोरख, डॉ. आशा सिंग, मनिषा तोकडे, डॉ. क्रांती जेजुरिकर, डॉ. श्रुती तांबे, मीनल जगताप, सुप्रसिद्ध लेखिका व प्रा. नीरजा, डॉ. प्रज्ञा दया पवार, यामिनी चौधरी, आशालता कांबळे, गीताली वि.म. शमिभा पाटील आदी अभ्यासकांनी शोधनिबंध सादर केलेत.

डॉ. लता प्रतिभा मधुकर यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ संपन्न झाला. त्या म्हणाल्या कुठल्याही चळवळीत व आंदोलनात आजपर्यंत स्त्रीयांचा सक्रिय सहभाग व योगदान महत्त्वाचे मानले जाते. आदिवासी, दलित, मुस्लीम, शीख समाजातील महिलांनी आपली शक्ती पणाला लावली आहे. महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा स्त्रीया पुढे नेत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया कार्य करीत आहेत. अजूनही महिलांच्या कार्याची नोंद घेतली जात नाही या विषयी त्यांनी खंत व्यक्त केली.

समारोपाच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. शोभा शिंदे म्हणाले की, 'महात्मा गांधी यांच्या अहिंसा, सत्याग्रह, सद्भावना विचारांचा स्वीकार करून स्वातंत्र्यचळवळीत अनेक स्त्रियांनी सहभाग नोंदविला होता. अनेक महिलांनी स्वतःच्या अंगावरील दागिने दान केले होते. विधायक कार्याची ऊर्मी घेऊन महात्मा गांधी यांच्या शिकवणीमुळे स्त्रीयांनी परिवर्तन घडवून आणले त्यामुळे स्त्रियांच्या कार्याची दखल घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. वंदना महाजन यांनी सर्व मान्यवर अभ्यासकांचे आभार मानले.प्रा. प्रमोद पवार, प्रा. ललित पाटील. मिलिंद दीक्षित, सुनील देसले, प्रशांत बागड व निलेश पाटील यांनी परिश्रम घेतले.



कार्यक्रमात सहभागी मान्यवर

कोव्हीड महामारिच्या काळात शारदा नेत्रालयअखंड रुग्णसेवा सुरु

कमलिनी वाणी हॉस्पिटल शारदा नेत्रालय या प्रकल्पात कोव्हीड महामारिच्या काळात देखील अखंड रुग्णसेवा सुरु ठेवून नेत्रालयाने गरीब व गरजू लोकांना एक प्रकारे आधार देण्याचे काम केले आहे. कोव्हीड लॉकडाउन काळात शारदा नेत्रालयाने केलेल्या कार्याचा आढावा थोडक्यात खाली देत आहोत.

OPD DETAILS						
Period	**Paid**	**Review Free**	**Camp**	**Subsidzed**	**Retina**	**Total**
January'20 to April'20	8371	4375	1853	895	445	***15939***
May'20 to August'20	5840	2001	130	655	361	***8987***
Sept. '20 to Dec. '20	10519	5311	153	245	780	***17008***
OT DETAILS (Surgery Details)						
Period	**SICS Free**	**SICS Paid**	**Phaco**	**Retina**	**Other**	**Total**
January'20 to April'20	550	324	983	38	189	***2084***
May'20 to August'20	101	221	540	20	69	***951***
Sept. '20 to Dec. '20	336	498	1409	40	156	***2439***






We accept donation from well-wishers

K.S.Wani Memorable Trust Current
Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

Reg.No. K.S. Wani Memorial Trust.No.E352/Dhule
FCRA Reg.No. 083820024
PAN No. AAATK9880K

Contact:K. S. WaniMemoral Trust, UnnatiNager
Nakane Road DeopurDhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org